# २४. धाडसी फेलिसिटा

आपण महाराष्ट्रात राहतो. महाराष्ट्र हे एक राज्य आहे. अशी अनेक राज्ये आपल्या भारतात आहेत. ओरिसा हे त्यांपैकीच एक राज्य आहे. या ओरिसा राज्यात घडलेली ही गोष्ट आहे.

गोष्ट आहे एका शूर, धाडसी मुलीची. या मुलीचे नाव आहे फेलिसिटा. पण लोक तिला प्रेमाने 'फेली' असे म्हणत.

ओरिसा राज्यात खूप नदया आहेत. सरोवरेही आहेत. सरोवर म्हणजे खूप मोठे तळे. अशा सरोवरातून पलीकडे जायचे तर नावेतून जावे लागते.

त्या दिवशी असे घडले —

बरेच लोक सरोवराच्या काठी जमले होते. पलीकडे जाण्यासाठी ते नावेची वाट बघत होते. नाव काठाला येताच जमलेले सगळे लोक नावेकडे धावले. भराभर ते नावेत चढू लागले. नाव लहान होती. लोकांची ही गर्दी पाहून नावाडी म्हणाला, "बस! पुरे पुरे. आता कोणी चढू नका."

नावाड्याचे कोणीच ऐकले नाही. सगळेच्या सगळे लोक नावेत चढून बसले. फेलीही त्याच नावेत होती.

नावाड्याने नाव सोडली. गर्दीमुळे नावेत ओझे फार झाले. नावाड्याला ती नीट चालवता येईना. जिकडे ओझे

जास्त होई तिकडे ती कलू लागली. तशात जोराचा वारा सुटला. नाव अधिकच हेलकावे खाऊ लागली. जोराच्या वाऱ्याने लाटांवर लाटा उसळू लागल्या. ती आता उलटते की काय असे वाटू लागले. नावेतले सगळे लोक घाबरले. फेली मात्र घाबरली नाही. लोकांना ती म्हणाली, "नावेतली गर्दी कमी करायला हवी. ती कमी झाली तरच धोका टळेल. ज्यांना पोहता येते त्यांनी पाण्यात उडया टाकाव्या." असे म्हणून तिने लगेच स्वतः पाण्यात उडी घेतली.

इतरांनी हे धाडस केले नाही. हेलकावे खाणाऱ्या नावेत ते तसेच बसून राहिले. जोराच्या वाऱ्याने नाव एका बाजूला एकदम कलली. त्याबरोबर त्यातून एक माणूस खाली पाण्यात पडला. तो गटांगळ्या खाऊ लागला. तो आता बुडतो की काय असे फेलीला वाटले. त्याला वाचवावे कसे हा तिला प्रश्न पडला. एवढ्यात लाकडाचा एक ओंडका जवळून वाहत चाललेला तिला दिसला. चपळाईने हात मारून तिने तो ओंडका पकडला. जलदीने पोहत ती त्या माणसाकडे गेली.



ओंडका तिने त्या माणसाच्या हाती दिला. ओंडक्याचा आधार मिळताच त्या माणसाला धीर आला. त्याला धरून तो पाण्यात तरंगू लागला. एवढयात आणखी एक मुलगा नावेतून पाण्यात पडला. तोही गटांगळ्या खाताना तिला दिसला.

झपाझप हात मारत फेली त्या मुलापाशी पोचली. तिने त्याला पकडले. आपल्या एका हाताचा आधार देऊन त्यालाही ती त्या ओंडक्याजवळ घेऊन आली. त्या ओंडक्याच्या आधाराने ते दोघेही कसेबसे पाण्यावर तरंगू लागले. त्यांना पोहता येत नव्हते हे तिच्या लक्षात आले. लोकांच्या मदतीची तिला गरज वाटली. सरोवराच्या काठाकडे तिने पाहिले. काही लोक तिथे उभे असलेले दिसले. त्यांची मदत घेण्यासाठी ती झपाझप हात मारत सरोवराच्या काठी आली.

ती खूप दमली होती. तिला धड बोलताही येत नव्हते. तिने कसेबसे हे सगळे लोकांना सांगितले. ते ऐकताच एका होडीत दोर घेऊन काही तरुण मदतीसाठी निघाले. बघता बघता ही होडी त्या लाकडाच्या ओंडक्याजवळ आली. त्यांनी दोर ओंडक्याकडे फेकला. त्या दोघांनाही त्यांनी ओढून होडीत घेतले. फेलीमुळेच आपला जीव वाचला याचा त्या दोघांना फार आनंद झाला.

फेलीच्या या धाडसाचे लोकांना फार कौतुक वाटले. तिच्या गावच्या लोकांना तर फारच आनंद झाला. फेलीच्या या

धाडसाची बातमी गावोगाव पसरली. तशीच ती दिल्लीलाही पोचली. २६ जानेवारीला दिल्लीला येण्यासाठी फेलीला बोलावणे आले.

२६ जानेवारी म्हणजे भारताचा प्रजासत्ताक दिन. या दिवशी दिल्लीत एक समारंभ केला जातो. या समारंभात दरवर्षी आपल्या देशातल्या अशा शूर, धाडसी मुलांचा गौरव केला जातो.

२६ जानेवारीच्या या समारंभास फेली दिल्लीला गेली. भारताच्या पंतप्रधानांनी फेलीची पाठ थोपटली. तिला पदक देऊन तिच्या धाडसाचे आणि शौर्याचे कौतुक केले.

फेलीसारख्या मुलामुलींचा कुणाला अभिमान वाटणार नाही ?





**प्रश्न :**

१. ही गोष्ट भारतातल्या कोणत्या राज्यात घडली आहे? २. सरोवराच्या काठी लोक का जमले होते? ३. नावाड्याला नाव चालवणे कठीण का झाले? ४. फेलीने नावेतून पाण्यात उडी का घेतली? ५. फेलीने दोघांचा जीव कसा वाचवला? ६. फेलीने दाखवलेल्या धाडसात तिचे आणखी कोणते गुण दिसून येतात?



२५